ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली

दिनांक :– १३.०८.२०२३

**प्रेसनोट**

आरोपी ईतर लोकसेवक राजेश बालाजी नाईक, वय २९ वर्षे, कंत्राटी तांत्रीक अधिकारी ,वर्ग – ईलोसे, पंचायत समिती ता. वसमत जि. हिंगोली रा. अशोक नगर ता.मुखेड जि. नांदेड यांनी ५,०००/–रू. लाचेची मागणी करून दिनांक ११.०८.२०२३ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान ५,०००/– लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे वसमत शहर. जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल झाला आहे.

---

दिनांक ११.०८.२०२३ रोजी यातील तक्रार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांचे ग्रामपंचायत बोरगाव बु. अंतर्गत त्यांचे नावे जागा असुन त्या जागेवर त्यांना रमाबाई आवास योजने अंतर्गत घरकुल मिळाले आहे त्या घरकुलाचे बांधकाम पुर्ण झाले असुन घरकुलासाठी मंजुर झालेली एकुण १२००००/– रू. रक्कमे पैकी त्यांना १०००००/–रू. मिळाले असुन उर्वरीत २००००/–रू. तक्रारदार यांचे बँक खात्यात टाकण्यासाठी लोकसेवक राजेश बालाजी नाईक, कंत्राटी तांत्रीक अधिकारी ,वर्ग – ईलोसे, पंचायत समिती ता. वसमत जि.हिंगोली यांनी ५,०००/– रू लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर तक्रादार यांचे तक्रारीची दि.११.०८.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता राजेश बालाजी नाईक, कंत्राटी तांत्रीक अधिकारी यांनी पंचासमक्ष ५,०००/– रू लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक ११.०८.२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष राजेश बालाजी नाईक, कंत्राटी तांत्रीक अधिकारी यांनी ५०००/– रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून राजेश बालाजी नाईक, कंत्राटी तांत्रीक अधिकारी ,वर्ग – ईलोसे, पंचायत समिती ता. वसमत जि.हिंगोली, रा.ह. अशोक नगर ता.मुखेड जि.नांदेड यांचे विरूध्द पोलीस स्टेशन वसमत शहर येथे गु.र.नं. ४१९/२०२३ क.७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शना खाली, पोलीस उप अधीक्षक श्री अनिल कटके, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, पोहेकॉ श्री तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींग, गजानन पवार, भगवान मंडलीक, मपोना श्रीमती योगीता अवचार, पोशि श्री राजाराम फुपाटे, शिवाजी वाघ, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

डॉ. राजकुमार शिंदे. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९६२३९९९९४४

श्री. अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८७०२२१३७९

टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५

अनिल ब. कटके
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.